अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३४३ठ. क्र.३९०
दि. १९/१/१६.....रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री.अजयकुमार गणपत चव्हाण- सहायक उद्यान अधिक्षक पदी एकवट मानधनावर नियुक्त सेवकास मुदतवाढ देणेबाबत श्री.चव्हाण-सहाय्यक उद्यान अधिक्षक यापदी एकवट मानधन रुपये १८०००/-व तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत आलेली असून, प्रस्तावात नमूद कारणास्तव त्यांना देण्यांत आलेली मुदत दिनांक १६/१२/२०१५ रोजी संपत असल्याने त्यांना मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये निर्माण केलेल्या सहाय्यक उद्यान अधिक्षक पदास व उपरोक्त कार्यरत सेवकास दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.१९/१२/२०१५ पासून पुढे अकरा महिन्याच्या कालावधी करीता मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.चे मान्यतेसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१७/१२/१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१९, दि. ८-१-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकब/~~खामुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-५ ठ. क्र. ३९९
३५२
दि. १८/२/१६ ......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-५/३५२

भवानी पेठ शाहीर वस्ती वर्धमान हाईट्स शेजारील हॉल भाडेतत्वावर देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. २७३, दि. २१-८-१५ अन्वये मान्यता देणेत आलेली असून, मा. स्थायी समितीचे ठरावाची अंमलबजावणी करणेस्तव व मा. सहा. संचालक नगर रचना यांचेकडील निश्चित करुन दिलेल्या भाडेदरानुसार अर्जदार जागृती ग्रुप सामाजिक बहुउद्देशीय संस्था शाहीर नगर, भवानी पेठ सोलापूर या संस्थेनी मागणी केलेल्या हॉलचे भाडे प्रस्तावात अ.क्र. १ ते ८ मधील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे अर्जदार संस्थेस सदर हॉलची जागा भाडयाने देणेकामी र.रु. ३३,२२१/- इतके प्रती माह भाडे होत आहे. तरी विषयांकित ठिकाणचे जागेचे मुल्य हे निश्चितपणे र.रु. ५०,०००/- पेक्षा जास्त होणार आहे. यास्तव अर्जदार संस्थेस हॉलची जागा प्रस्तावात नमूद भाडेदराप्रमाणे देणेबाबत मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण क्र. ७ मधील कलम ७९ नुसार धोरणात्मक निर्णयास्तव मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २८-११-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

भवानी पेठ टी. पी. २ फा. प्लॉट नं. ५०/१२, प्लॉट नं. ३, सि.स.नं. ५०/१२ येथील शाहीर वस्ती वर्धमान हाईट्स शेजारील हॉल जागृती ग्रुप सामाजिक बहुउद्देशीय संस्था शाहीर नगर, भवानी पेठ सोलापूर यांना दरमहा भाडे र.रु. १५००/- इतके आकारणी करुन भाडेतत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~खासगी~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३२८ ठ. क्र. ३९२
दि. १८/२१९६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



कु. दिपीका केशव पवार, रा. प्रताप नगर विजापूर रोड सोलापूर ही संगमेश्वर कॉलेजची विद्यार्थी असून तिने राष्ट्रीय स्तरावर ॲथलेटीक्स स्पर्धेत अश्वमेघ व ऑलइंडिया स्तरावर भाग घेतला असून कबड्डीमध्ये आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग घेतला असता, तिच्या डाव्या गुडघ्यामध्ये लिगामेंट क्रॅंक झाले असून त्यांच्या गुडघ्यावर ऑपरेशन करणे अत्यंत आवश्यक आहे त्यासाठी र.रु. ७५,०००/- खर्च येणार आहे. कु. दिपीका केशव पवार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 329 ठ. क्र. 393 दि. 28/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. अल्ताफ शौकतअली सय्यद, रहा. दक्षिण सदर बझार, घ.क्र. ८०, सोलापूर यांचे राहते घरी दि. २०-११-२०१५ रोजी शॉर्ट सर्किटने आग लागून संसारोपयोगी साहित्य आगीमध्ये भस्मसात झालेले आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांना पुन्हा संसार उभारण्यासाठी आर्थिक मदतीची आवश्यक आहे. तरी महानगरपालिकेचे वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका